# -: प्रेसनोट:-

दिनांक १८/०७/२०२१

## डोंगरी परिसरातून प्रतिबंधीत वनसंपदा आगर वुड व आगर वुड तेलाचा बेकायदेशीर साठा जप्त.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | गुन्हा नोंद कमांक व कलम | :- | गु.प्र.शा. स्था.गु.र.क्र.२३ /२०२१, भारतीय वन अधिनियम १९२७ कलम ४१, ४२ सह महाराष्ट्र वन नियमावली २०१४ नियम ३१ व ८२ (डोंगरी पो.ठाणे वि.स्था.गु.र.क.३१ /२०२१ ) |
| ०२. | फिर्यादीचे नाव | :- | श्री. संजय भाऊ तुपे, वय ५१ वर्षे, धंदा-नोकरी (पो.शि.क्र, ९८-०५३९), कक्ष १, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई ) |
| ०३. | गुन्हा घडला दिनांक व वेळ | :- | दिनांक १७/०७/२०२१ रोजी २२.२० वा. दरम्यान |
| ०४. | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | :- | दिनांक १८/०७/२०२१ रोजी ०४.०० वाजता. |
| ०५. | गुन्हयाचे ठिकाण | :- | रुम कमांक २०९, दुसरा मजला, सेंट्रल हाउस, प्लॉट नंबर ११५/१२७, निशाणपाडा, खडक, चिंचबंदर रोड, डोंगरी, मुंबई-०९ |
| ०६. | आरोपीचे अटक | :- | २ इसम |
| ०७. | हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता | | प्रतिबंधित वनसंपदा अगार वुड (Agar wood) लाकुड एकुण २१ किलो ३० ग्रॅम व अगार वुड (Agar wood) तेल एकुण वजन १३ किलो ९९४ ग्रॅम (अशी एकूण रुपये ५६,९७,५०८/- रुपये किंमतीची मालमत्ता) |
| ०८. | गुन्हयाची पध्दत | | प्रतिबंधित वनसंपदेचा बेकायदेशीर साठा |

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-</u>**

दिनांक १७/०७/२०२१ राजी गुप्रशा.,गुअवि.कक्ष-१ यांना अशी माहिती मिळाली की, डोंगरी परिसरात काही इसमांनी प्रतिबंधीत अगार वुड (Agar wood) या वनसंपदेचा अवैधरित्या साठा केलेला आहे.त्यानुसार प्रपोनिपाटील व पथक यांनी वनपाल श्री.शंकर केरबा ऐनवाड/ ठाणे यांच्या सह कॉलम नं.६ ठिकाणी पंचा सोबत छापा कारवाई करण्यात आली. सदर ठिकाणी दोन इसम लाकडांचे तुकडे, प्लास्टीक कंटेनर मध्ये व काळया रंगाच्या तेलाचे प्लॉस्टीक बाटल्या मध्ये साठा केलेल्या स्थितीत मिळून आले. वनपाल श्री. ऐनवाड यांनी नमुद मालाची तपासणी केली असता ते अगार वुड व अगार तेल असल्याची खात्री झाली. नमुद इसमाच्या ताब्यातून अगार वुड लाकडाचे तुकडे वजन २१ किलो ३० ग्रॅम , किंमत अंदाजे रुपये १०,५१,५००/- . आणि अगार वुड तेल वजन १३ किलो ९९४ ग्रॅम, किंमत अंदाजे रूपये ४६,४६,००८/- अशी एकूण रुपये ५६,९७,५०८/- रूपये किंमतीची मालमत्ता पंचनाम्या अंतर्गत हस्तगत करण्यात आली आहे.

ताब्यात घेतलेल्या इसमा विरूध्द डोंगरी पो. ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गुप्रशा.,गुअवि., कक्ष १ करीत आहे. आरोपीताना रिमांडकामी मा.न्यायालयात हजर केले असता दिनांक २२/०७/२०२१ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिमांड देण्यात आलेली आहे.

सदर कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री.मिलिंद भारंबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.विरेश प्रभू सो, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री.प्रकाश जाधव सो, मा.सहाय्यक पेलीस आयुक्त, श्रीसोपान निघोट सो,यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, कक्ष-१, मुंबई चे प्रपोनि. पंढरीनाथ पाटील यांचे नेतृत्वाखाली पोनि. बाळासाहेब शिंदे, स.पो.नि. प्रशांत गावडे, स.पो.नि. जयेश ठाकुर, पोउ.नि. सुभाष मुठे, पो.उ.नि. प्रवीण महाजन, पो.ह.क्र. ९६०२८९/शिंदे,पो.ह.क. १०८४४/शेडगे, पो.ना.क्र. ९९०३९२/भादले, पोशिक ९८०५३९/तुपे, पो.शि.चा.क. १४०८९४/वऱ्हाडी, म.पो.शि.क.१४०५०८/सावंत यांनी पार पाडली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउनि.मुठे हे करीत आहेत.

.......

Scanned with CamScanner